भारतीय जनता पक्ष

(केंद्रिय कार्यालय)

11, अशोक रोड, नवी दिल्ली- 110001

फोनः 011-23005700, फॅक्स- 011-23005787

सीटीझन चार्टर बिलासंदर्भात भाजपा राष्ट्रीय प्रवक्ता आणि खासदार श्री प्रकाश जावडेकर यांचे प्रसिद्धिसाठीचे वक्तव्य

<u>सिटीझन चार्टर बिल 2011</u>

केंद्रिय मंत्रिमंडळाने सिटीझन चार्टर बिल 2011 मंजुर केला. ते बिल राज्याच्या अधिकारक्षेत्रावर थेट हस्तक्षेप आहे, कारण की सर्व राज्यांना पण असाच कायदा लागू करणे अनिर्वार्य आहे. दहापेक्षा अधिक राज्यांनी सिटीझन चार्टर कायदा म्हणजेच जाहीर सेवा गॅरंटी अक्ट आपापल्या राज्यात लागू केलेला आहे. जम्मू आणि काश्मीर, दिल्ली, बिहार, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश, राजस्थान, पंजाब, उत्तराखंड आणि हिमाचल प्रदेशमध्ये हा कायदा आहे. त्या कायद्यात अनेक तरतूदी केंद्र सरकारच्या सूचित कायद्यापेक्षा खुप चांगली आहे. आहेत.

घटनेची यादी-2 च्या कलम-41 अंतर्गत राज्यांना जाहीर सेवा गॅरंटी कायदा लागू करण्याची सत्ता देण्यात आलेली आहे. म्हणून केंद्र सरकारने राज्यांना अनिर्वार्यपणे असा कायदा घडवण्यासाठी यादी-3 कलम-8 खाली सांगितले आहे. केंद्र सरकार केंद्रिय सेवेसाठी सिटीझन चार्टर कायदा आणत आहे, पण राज्यांच्या अधिकारक्षेत्रात हस्तक्षेप केला नाही पाहिजे. केंद्र सरकार आदर्श कायदा आणू शकते.

राष्ट्रीय जनसंख्या गणना

सरकारने शेवटी या बाबतची कबुली केली की राष्ट्रीय जनसंख्या गणनेच्या कार्यात विलंब झाला आहे. त्याचे कारण हे आहे की आधारमध्ये पूर्ण प्रकारे बायोमॅट्रिक डेटा मिळत नाही. सरकार प्रश्न-994 करोड च्या उत्तरात अशी स्पष्टता दिली आहे की राष्ट्रीय जनसंख्या गणनेची मागितलेली माहिती कागदावर उपलब्ध आहे. संपूर्ण देशभरात घराची यादी तसेच घराची वसति गणनेचा आकडा एकत्र करण्याचे कार्य 2010 मध्ये पूर्ण झाले. राष्ट्रीय जनसंख्या गणनेला मिळालेली 25 करोड अर्जांचे स्कॅनिंग पूर्ण झाले आहे. 114 करोड रेकॉर्डची डेटा एन्ट्रीचे काम पूर्ण झाले आहे. परंतु बायोमॅट्रीक डेटा फक्त 11 करोड व्यक्तिंचेच उपलब्ध आहेत. याचा अर्थ असा होतो की राष्ट्रीय जनसंख्या गणनेचे बायोमॅट्रीक डेटाचे महत्त्वाचे कार्य अर्धवट पडले आहे. नागरिकत्व कार्ड आणि त्याच्या रेकॉर्ड साठी ही गोष्ट अगत्याची आहे. राष्ट्रीय सुरक्षेच्या

दृष्टीने पण ही बाब महत्त्वाची आहे. सरकारने आणखी एका प्रश्नावर उत्तर देताना सांगितले की, आतापर्यंत फक्त 22 करोड लोकांचा बायोमॅट्रीक डेटा च एकत्रीत करण्यात आला आहे. दोन्ही उत्तरांवर नजर टाकली असता असे कळते की राष्ट्रीय जनसंख्या गणनेचे कार्य बायोमॅट्रीक डेटा अभावी अडले आहे.

भाजप अशी मागणी करते की सरकार राष्ट्रीय जनसंख्या गणनेच्या आधारे नागरिकत्व रजीस्टर करण्यासाठी स्पष्ट योजना घडवली पाहिजे.

(आर. के. सिन्हा)

मानद मंत्री

भाजप संसदीय पक्ष